# (महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/८-अ/मुफसल/(स्वीय सहायक)पदोन्नती/६३/२०१७ मुंबई, दि.१२/५/२०१७

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मोफ्युसील लिपिक संवर्गातील खालील नमुद उच्चश्रेणी लघुलेखकांना कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून "स्वीय सहायक, गट - ब (राजपत्रित)" पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीवर त्यांची नेमणुक त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयांत करण्यात येत आहे :-

| अ.क्र | उच्चश्रेणी लघुलेखकाचे नांव | सध्याचे नेमणुकीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.मारुती अजाबराव जुनघरे | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर | विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

२. शा.नि., वि.वि., क्र.पीएच्वाय/१०८५/सीआर/११०० (२)/एसईआर-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत द्यावा व अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन)नियम,११ (१),(अ), अन्वये केली जाईल, याची संबंधीत उच्चश्रेणी लघुलेखकांना नोंद घेण्यास सांगावे.

३. उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखकांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, न्यायालयाने पदोन्नतीसाठी आक्षेप नोंदविलेला असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच प्रलंबीत नसेल तर, पदोन्नतीवर पर्यायी उच्चश्रेणी लघुलेखकांची वाट न पाहता, नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि त्याप्रमाणे या कार्यालयास कळवावे. संबंधीत घटक प्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत संबंधीतांना कार्यमुक्त न केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक कार्यालयाची राहील.

५. श्री.मारुती अजाबराव जुनघरे हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक १६/०५/२०१७ पर्यंत ) घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक १७/०५/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपाल अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. पदोन्नती आदेशानंतर श्री.मारुती अजाबराव जुनघरे यांनी रुग्ण निवदेन केल्यास अथवा गैरहजर राहिल्यास त्यांना रुग्ण निवदेनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved ) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

प्रत माहितीकरीता :

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १०, १२, १४-अे, ३६ व ४०

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.